# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०५८४/२१/अ.क्र.५९३८/२४/०१**

**श्री. इक्बाल आर. खान**
एकता नगर, ए/१५, रुम नं.१०, यशवंतराव चव्हाण नगर,
घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, मंडाळा मानखुर्द (प.),
मुंबई-४०० ०४३.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) आर/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
स.व प.तरण तलावाजवळ, महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली (प), मुंबई ४०००६७.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
स.व प.तरण तलावाजवळ, महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली (प), मुंबई ४०००६७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.१२.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. रोजी प्राप्त. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित/अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित/अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०७.२०१९ | २०.०८.२०१९ | २०.०४.२०२० | १९.१०.२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. २०.०८.२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. १९.१०.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि. ११.०२.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. २३.०७.२०१९ अन्वये "आर/दक्षिण विभागातील प्रभाग क्र. २६ या ठिकाणी ट्रेंच कामे मधील लागणारी निधीची माहितीची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) आर/दक्षिण विभाग यांनी अपिलकर्तांना निरीक्षणाची संधी देवून विहीत शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारींनी माहिती न दिल्याने दि. २०.०४.२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) एम/पश्चिम विभाग यांनी दि. १९.१०.२०२० रोजी "अपीलार्थी यांनी मागितलेली माहितीचे शुल्क भरल्याची पावती सादर केली असल्यास

अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी स्पीड पोस्टाद्वारे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी” असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. ११.०२.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता आर/दक्षिण विभाग, श्री. हेमंत पंत उपस्थित आहे. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग अनुपस्थित आहे.

अपीलार्थी यांनी आयोगासमोर असे सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता आर/दक्षिण विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. तसेच दि. १७.०३.२०२० रोजी रु. १७००/- इतके शुल्क भरण्यात आल्याचे पत्र सादर केले आहे. अपीलार्थी यांनी रु. १७००/- इतके शुल्क भरल्याचे पत्र आज सुनावणी दरम्यान पुन्हा जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिले आहे.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे विनंती केली आहे की, सदर माहिती नि:शुल्क मिळावी व यापूर्वी भरण्यात आलेली रक्कम परत करण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता आर/दक्षिण विभाग यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी व अपीलार्थी यांच्याकडून सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त केलेली रक्कम अपीलार्थी यांना परत करण्यात यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
17-12-2024

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७.१२.२०२४**

State Information Commission ★ Maharashtra ★ सत्यमेव जयते